जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.tfzone125@mahapolice.gov.in
THANE POLICE COMMISSIONERATE

प्रेसनोट

दिनांक :– ०६/०९/२०२४

# अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी

## 'एमडीएमए या पार्टी ड्रग्ज ची तस्करी करणारे आंतरराज्यीय आरोपीसह एकुण ०२ आरोपी अटक करून एकूण ४७६ ग्रॅम वजनाच्या एमडीएमए या पार्टी ड्रग्जसह ९५,२०,०००/- रू किंमतीचा मुद्येमाल हस्तगत '

------------------ooo------------------

ठाणे पोलीस आयुक्तालयातील अंमली पदार्थ विक्री, वितरण, साठवणुक, उत्पादन, सेवन करणारे इसमांचा शोध घेवुन प्रचलित कायद्यांतर्गत कारवाई करणेबाबत मा.पोलीस आयुक्त, ठाणे यांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,ठाणे डॉ.श्री.पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे,ठाणे श्री.शिवराज पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रतिबंध)श्री.धनाजी क्षिरसागर यांचे मार्गदर्शनाखाली मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राहुल मस्के यांनी अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात अंमली पदार्थ विक्री, वितरण, साठवणुक, उत्पादन, सेवन करणारे इसमांचा शोध सुरू करण्यात आला.

त्याअनुषंगाने माहीती घेत असतांना दिनांक ३१.०८.२०२४ रोजी इकडील नेमणुकीतील पोहवा/६३३१ हुसेन तडवी यांना प्राप्त माहीतीच्या आधारे मा. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली सापळा कारवाई करून दि.०१/०९/२०२४ रोजी ११:०५ वा. मुंब्रा शहरातील फॉर्चुन हाईटस अपार्टमेंट समोर, वाय जंक्शन ब्रिजजवळील ठाणेकडे जाणारे वाहिनीवर, मुंब्रा येथे इसम नामे १) **तबरेज अबुजाफर बक्षी, रा.घासकोपरी, विरार (पुर्व) जि. पालघर** यास ताब्यात घेवुन त्याचे कब्जातून **एकूण ४७६ ग्रॅम वजनाचा रू ९५,२०,०००/- किंमतीचा एमडीएमए हा अंमली पदार्थ** व इतर वस्तू हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. सदरचा अंमली पदार्थ त्याने कोठुन आणला याबाबत तपास केला असता त्याने सदरचा अंमली पदार्थ हा राजस्थान राज्यातील रहिवाशी असलेला त्याचा साथीदार एजाज शेर खान उर्फ पठाण याचेकडुन प्राप्त केला असल्याची माहिती दिली. आरोपीने दिलेल्या माहीती वरून आरोपी क्र.२) **एजाज शेर खान उर्फ पठाण, रा. साकरीया प्रतापगढ, वर्मडल, राजस्थान** यास **विरार येथील एका हॉटेल येथून अटक** करण्यात आलेली आहे. यापुर्वी **देखील दोन्ही आरोपीतांवर मुंबई पोलीस आयुक्तालयात अंमली पदार्थ विक्रीबाबतचे गुन्हे दाखल आहेत.**

अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा कारवाई करून, सदर बाबत **मुंब्रा पोलीस स्टेशन येथे गु.रजि.क्र.१८४४/२०२४ एनडीपीएस कायदा कलम ८(क),२२, (क),२९ प्रमाणे** गुन्हा नोंद करण्यात आलेला असून, आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून मुंब्रा व ठाणे परिसरात आरोपी यांचा एमडीएमए या अंमली पदार्थाची तस्करी

करण्याचा कट उघडकीस आणलेला आहे.एमडीएमए हे पार्टी ड्रग्ज असुन ते Ecstasy/Molly या नावाने देखील ओळखले जात असुन उच्चभ्रू वर्गात तसेच रेव पार्टीमध्ये मोठया प्रमाणावर वापरले जाते.

सदरची कामगिरी मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक - राहुल मस्के, सपोनि/जगदीश गावीत, पोलीस उप निरीक्षक /दिपेश किणी, पोउपनिरी/राजेंद्र निकम,पोहवा/१४९५ शिवाजी वासरवाड, पोहवा/१८५९ हेमंत महाले, पोहवा/२७८८ महेश साबळे, पोहवा/६३३१ हुसेन तडवी, पोना/४८४७ अनुप राक्षे, मपोहवा/६८५२ शिल्पा कसबे, मपोकॉ/३४ कोमल लादे यांचे पथकाने केलेली आहे.

गुन्हयाचा पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोउपनिरी/राजेंद्र निकम हे करीत आहेत.

---------oo---------------